 △CCE PF/NSR & NSPR(C)/500/6644

**C**

ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 12 ]

Total No. of Printed Pages : 12 ]

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 59 ]

Total No. of Questions : 59 ]

**CCE PF**
**UNREVISED**
**FULL SYLLABUS**
**NSR & NSPR**

Question Paper Serial No. **500**

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M**

**Code No. : 08-M**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

# Subject : First Language — MARATHI

**(ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಎನ್.ಎಸ್.ಆರ್. & ಎನ್.ಎಸ್.ಪಿ.ಆರ್.)**

**( Private Fresh / NSR & NSPR )**

ದಿನಾಂಕ : 31. 03. 2023 ] [ Date : 31. 03. 2023

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-30 A.M. to 1-45 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125 ] [ Max. Marks : 125

**विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघुत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रकारचे 59 प्रश्न आहेत.
2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परोक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.
3. बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघुत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रकारच्या प्रश्नासाठी दिलेल्या सचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठो 15 मिनिटेही दिलेली आहेत.

येथून कापा.

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.**

**Tear here**

[ Turn over

**I. पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी याग्य पर्याय निवडून उत्तर लिहा : 10 × 1 = 10**

1. ‘उज्ज्वल’ या शब्दाचा संधी विग्रह असा होतो –

(अ) उज् + ज्वल (ब) उत् + ज्वल

(क) उज्ज्व + ल (ड) उत + ज्वल

2. ‘माळ्याने बाग फुलवली.’ अधोरेखित शब्दाची विभक्ती लिहा –

(अ) चतुर्थी (ब) सप्तमी

(क) तृतीया (ड) पंचमी

3. “चिमणी घरटे बांधत होती.” या वाक्यातील काळ ओळखा –

(अ) अपूर्ण वर्तमानकाळ (ब) अपूर्ण भूतकाळ

(क) पूर्ण भूतकाळ (ड) अपूर्ण भविष्यकाळ

4. खालीलपैकी कर्मणी प्रयोगाचे उदाहरण हे आहे –

(अ) मी पुस्तक वाचतो (ब) तो पुस्तक वाचतो

(क) तिने पुस्तक वाचले (ड) ती पुस्तक वाचते

5. बुडत्याला .................. म्हण पूर्ण करा.

(अ) जहाजाचा आधार (ब) डब्याचा आधार

(क) ओंडक्याचा आधार (ड) काडीचा आधार

6. 'प्रेतापुढे हातात धरलेले शिंकोळे.' या शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा –

(अ) डेरा (ब) हंडा

(क) टिटवं (ड) तांब्या

7. 'मोबाइल' हा शब्द कोणत्या भाषेतून आला आहे ?

(अ) इंग्रजी (ब) संस्कृत

(क) फारसी (ड) कन्नड

8. 'राणी' या शब्दाचे लिंग कोणते ?

(अ) पुल्लिंगी (ब) स्त्रीलिंगी

(क) नपुंसकलिंगी (ड) उभयविध

9. 'स्वल्पविराम' साठो खालीलपैकी कोणते चिह्न वापरतात ?

(अ) , (ब) .

(क) ? (ड) !

10. "तू खेळावयास येणार का ?" या वाक्याचा प्रकार कोणता आहे ?

(अ) होकारार्थी (ब) नकारार्थी

(क) प्रश्नार्थी (ड) विधानार्थी

**II. पहिल्या दोन पदांचा संबंध आळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा :** **5 × 1 = 5**

11. ज्ञानप्रकाश : षष्ठी तत्पुरुष : : क्षणाक्षणाला : ................

12. सुंदर : विशेषण : : हिमालय : ..............

13. आर्जव : विनवणी : : भास्कर : ..................

14. सफल : असफल : : दुःख : .......................

15. नेनंता गुराखी : इंद्रजीत भालेराव : : धरण : .......................

**III. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** **8 × 1 = 8**

16. चिं. वि. जोशीनी मराठी साहित्यात कोणती दोन पात्रे लोकप्रिय केली ?

17. 'वाटणी' या कथेचे मूल्य कोणते ?

18. 'वाटणी' कथेचे लेखक कोण ?

19. रुक्मिणी श्रीकृष्णाबरोबर कोणत्या पद्धतीने विवाह करू इच्छिते ?

20. रुक्मिणी लग्नाआधी कोणाचे दर्शन घेण्यास जाणार आहे ?

21. 'पाठ आणि पोट यांचा झाला टाळ' या कवितेचा साहित्यप्रकार कोणता ?

22. भुकेलेल्या पोटांना काय वर्ज्य नाही ?

23. महानुभाव पंथाचे संस्थापक कोण आहेत ?

**IV. खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा : 3 × 2 = 6**

24. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

अ) गुत्तं घेणे ब) काळाला जिंकणे.

25. अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

'शीलाची किंमत शिक्षणाहून अधिक आहे.'

26. गण पाडून वृत्त ओळखा.

पावेन पाय शिवही नमितो जयाते.

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा : 12 × 2 = 24**

27. जपानच्या प्रगतीला कोणत्या दोन गोष्टी कारणीभूत होत्या ?

28. बांबूच्या झाडाला फुले केव्हा येतात ? राखीने दिलेले झाड का वाढत नव्हते ?

29. विरहिणी म्हणजे काय ?

30. "माझी काही एकादशी नि दुप्पट खाशी अशातली गत नाही." संदर्भासह स्पष्टीकरण करा.

31. लेखक परिचय लिहा – अनंत काणेकर.

32. "पिसारा प्रभेचा उभारून दारी पहाटे उभा शुक्र हा प्रेमळ." संदर्भासह स्पष्टीकरण करा.

33. परिचय लिहा – प्र. के. अत्रे.

34. दुकानदाराला आश्चर्य का वाटले ?

35. ज्योतिबांनी सावित्रीबाईंना कशा तऱ्हेने शिकवले ?

36. माळावरच्या थळोबावर लेखकाचा विश्वास का नव्हता ?

37. लोकसाहित्यात माहेरचा दूत कोणाला म्हणतात ? कवी कोणाशी बोलत आहे ?

38. भुके जीव काय काय करतील असे कवी म्हणतो ?

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा :** **1 × 3 = 3**

39. अ) 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी.'

**किंवा**

ब) 'वाचाल पुस्तक तर घडेल मस्तक.'

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे पाच-सहा वाक्यात लिहा :** **13 × 3 = 39**

40. 'अनंतशक्तिः परमेश्वरू' या कथेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

41. बालपरवेशी व नानापरवेशी म्हणजे काय ?

42. आई-बाबा मुलांना शाळेत का पाठवित नसत ? शिक्षणामुळे मुलांच्यात कोणता बदल झाला होता ?

43. 'क्रांतीज्योती सावित्रीबाई' या पाठाच्या आधारे 'सावित्रीबाई फुले' यांच्या गुणांचे वर्णन करा.

44. आक्काला अण्णांनी काय करावे वाटत असे ? आणि का ? लेखक कोणते दिवास्वप्न पहात असे ?

45. धर्माच्या नावाखाली ढोंगी गुरु काय काय करतो ?

46. 'गाऊ त्यांना आरती' या कवितेमध्ये कवी यशवंत कोणाकोणाचा गुणगौरव करू इच्छितात ? स्पष्ट करा.

47. 'नेनंता गुराखी' या कवितेचा आशय तुमच्या शब्दात लिहा.

48. 'धरण' कवितेतील स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे ?

49. 'सुन्या तिच्याही दाही दिशा' या कवितेचा भावार्थ लिहा.

50. क्लबच्या पार्टीत कोणकोण स्त्रिया आल्या होत्या ? त्या पार्टीचे सविस्तर वर्णन करा.

**किंवा**

जपानमध्ये कोणते निरूद्योगी प्रकार आढळत नाहीत ? जपानमधील मुली कोणकोणती कामे करतात ?

51. श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी काय करणार आहे ?

52. पृथ्वी-सूर्य यांचा संवाद कवितेच्या आधारे तुमच्या शब्दात लिहा.

**1**

**VIII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ-दहा वाक्यात लिहा :** **4 × 4 = 16**

53. 'विद्या आणि शील' या गुणाबद्दल आंबेडकर काय म्हणतात ?

54. गंगूबाईंनी संगीत शिकण्यासाठी कशाप्रकारे कष्ट घेतले ? त्यांची गुरुनिष्ठा कोणत्या प्रसंगातून दिसून येते ?

**किंवा**

बेळगावी कॉंग्रेसमधील घटनांचे सविस्तर वर्णन करा.

55. 'सत्कार' कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

**किंवा**

हिरव्या तृणपात्याचा सत्कार का व कसा करण्यात आला ते लिहा.

56. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :

या भारतात ......................................

......................................................

...................................... हो इस्लामी.

**किंवा**

खलनिंदका मनीही ..............................

............................................ बावरी

.............................. दे वरचि असा दे.

**IX. खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :** **1 × 4 = 4**

57. महात्मा फुले म्हणतात, ज्याचे मन सत्याने पवित्र झाले आहे, तो जगातील सर्वात पवित्र माणूस. ज्या मनुष्याला मनाच्या पावित्र्याचे महत्व कळत नाही, तो मनुष्य धरणीस भार ठरतो. निर्दोषी आणि उद्योगी जीवन मनुष्याला आरोग्य नि संपत्ती देते. आळशी मनुष्य हा दुष्ट असतो. तो समाजाचा शत्रू बनतो. तो कधीहो सुखी होत नाही. उद्योगी आणि शुद्ध चरित्र्याचा मनुष्य हा गरिबांचा वाली असतो. तो अनेकांना सुखी करतो. सत्यप्रेमी, निर्मळ मन आणि शांत हृदय यांतून धैर्य निर्माण होते. धैर्यशील मनुष्य हालअपेष्टा सहन करतो आणि संकटावर मात करतो.

**प्रश्न :**

अ) मनुष्याला आरोग्य व संपत्ती कशामुळे मिळते ? 2

ब) धैर्यशील माणूस कसा ओळखावा ? 2

**1**

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा : 1 × 5 = 5**

58. मोबाईलचे व्यसन सुटण्यासाठी लहान भावाला मार्गदर्शन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

तुमच्या शाळेतील स्नेहसंमेलनासाठी प्रमुख पाहुण्यांना निमंत्रण देणारे पत्र लिहा.

**XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा :**

**1 × 5 = 5**

59. अ) मी स्वातंत्र्य सैनिक बोलतोय.

ब) माझे बाबा.